महासत्ता

# संकपाळ हायस्कूलमध्ये सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन

निपाणी,ता.२५(प्रतिनिधी)–

.................................

**आजच्या डिजिटल युगात सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर आणि क्विक हील फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम सुरू आहे.**

या उपक्रमाअंतर्गत देवचंद महाविद्यालयातील सायबर वॉरियर्स अश्विनी मुळीक आणि वसुधा खोत यांनी श्रीपेवाडी येथील जी. एम. संकपाळ हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा,ऑनलाईन फसवणूक,फिशिंग लिंक, मजबूत पासवर्ड, सोशल मीडिया सुरक्षितता, व बँकिंग माहितीची गोपनीयता, सायबर गुन्ह्यांपासून बचाव आणि सायबर तक्रार नोंदविण्याच्या पद्धती याबाबत मार्गदर्शन केले.सायबर वॉरिअर क्लबचे समन्वयक प्रा.प्रशांत कुंभार,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एम. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा'हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यापासून सुरक्षित ठेवणे,डिजिटल साधनांचा जबाबदारीने वापर करण्यास प्रवृत्त करणे आणि 'सुरक्षित डिजिटल नागरिक' घडविणे हा उद्देश आहे.